सन १९७५ ते १९७७ मधील आणिबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणा-या ज्या व्यक्तींना बंदीवास सोसावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्यासंबंधी धोरण ठरविण्याकरिता मंत्रिमंडळ उपसमिती नेमणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक निवृवे-१०१५/प्र.क्र.२६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ३२
दिनांक -१४ फेब्रुवारी, २०१८.

प्रस्तावना :

भारतामध्ये दिनांक २५.६.१९७५ ते दिनांक ३१.३.१९७७ या कालावधीत आणिबाणी घोषित करण्यात आली होती. या कालावधीत ज्या व्यक्तींना बंदीवास सोसावा लागला, अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्याबाबतचा प्रस्ताव विभागातर्फे दिनांक २.१.२०१८ रोजी पार पडलेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर बैठकीमध्ये यावर मा.मंत्रिमंडळाने चर्चा केली आणि “या विषयावरील धोरण ठरविण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती” नेमण्याचा निर्णय घेतला.

मा.मंत्रिमंडळ बैठकीतील सदर निर्णयानुसार या प्रकरणी मंत्रिमंडळ उपसमिती नेमण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

भारतामध्ये दिनांक २५.६.१९७५ ते दिनांक ३१.३.१९७७ या कालावधीत आणिबाणी घोषित करण्यात आली होती. या कालावधीत ज्या व्यक्तींना कारावास सोसावा लागला, अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करणेबाबत धोरण ठरविण्यासाठी मा.मंत्री,महसुल यांच्या अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे “मंत्रिमंडळ उपसमिती” गठीत करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर मंत्रिमंडळ उपसमितीची रचना पुढीलप्रमाणे राहील-

१. अध्यक्ष- मा.मंत्री, महसुल
२. सदस्य- मा.मंत्री (कृषी)
३. सदस्य- मा.मंत्री(अन्न व नागरी पुरवठा)
४. सदस्य-मा.राज्यमंत्री (गृह)
५. सदस्य- मा.राज्यमंत्री (सामान्य प्रशासन)
६. सदस्य- अपर मुख्य सचिव (वित्त विभाग)
७. सदस्य- अपर मुख्य सचिव (गृह विभाग)
८. सदस्य -प्रधान सचिव व वि.चौ.अ.१(सामान्य प्रशासन विभाग)
९. सदस्य सचिव- उप सचिव स्वातंत्र्य सैनिक कक्ष(सामान्य प्रशासन विभाग)

मंत्रिमंडळ उपसमितीची कार्यकक्षा पुढीलप्रमाणे राहील-

प्रस्तुत उपसमिती सदर योजनेकरिता पात्र लाभार्थ्यांकरिताचे निकष, अटी व शर्ती निर्धारित करेल. आजमितीस मध्यप्रदेश, छत्तीसगढ व राजस्थान या राज्यांमध्ये सदर योजना लागू आहे. त्याबाबत तौलनिक अभ्यास, कायदेशीर बाबी व राज्यावर पडणारा संभाव्य वित्तीय भार याबाबत सदर उपसमिती तपासणी करेल. तसेच या योजनेचे नाव उपसमिती सुचवेल त्याप्रमाणे असेल. या योजनेंतर्गत पात्र अर्जदारास एकरकमी रक्कम दयावी अथवा दरमहा किती रक्कम दयावी याबाबत उपसमिती निर्णय घेईल.

सदर उपसमिती आपला अहवाल चार महिन्यात सादर करेल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०२१४१७४३४४१४०७ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arun Vasnt Shinde

Digitally signed by Arun Vasnt Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=213d983c0c3b73519fa14c37396dd0b3cf8f28e16bc2fb6620a5c4fdac6e7284, serialNumber=672d36cc7468aa812e66dbb4704ffeb120dd58831284824f4fbec2a6f6602199, cn=Arun Vasnt Shinde
Date: 2018.02.14 19:11:22 +05'30'

(अरुण व. शिंदे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहाय्यक मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव (वित्त) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६. प्रधान सचिव व वि.चौ.अ.१ यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७. उप सचिव स्वातंत्र्य सैनिक कक्ष (सामान्य प्रशासन विभाग), मंत्रालय, मुंबई
८. निवड नस्ती/स्वासैक-१